# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक १८.०५.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १७.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून ११,०५०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसमध्ये १० ईसमावर कारवाई करून ११,०७०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,८७६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,५७,८००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— गोंदीया येथील घरफोडीचे गुन्ह्यातील आरोपीस अटक.**

दिनांक १५.०५.२०२६ चे २०.०० वा. ते दि. १६.०५.२०२६ चे ०३.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गोंदीया शहर हद्दीत, बि.एस.एन.एल. ऑफीसचे बाजुला सिव्हील लाईन येथील घरफोडीचे गुन्हयातील पाहीजे आरोपी हा नागपुर येथे आलेला आहे, अशा प्राप्त गुप्त माहीतीवरून गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी सापळा रचुन, कामगार नगर, आमना मस्जीद जवळ, कामठी येथे राहणारा आरोपी नामे शेख जाफर शेख मुजफ्फर, वय ४५ वर्षे यास ताब्यात घेवुन, त्यास विचारपूस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव गोंदीया शहर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोउपनि. विशाल सांगोडे, पोहवा. राजु टाकळकर, अनिस खान, रूपेश नानवटकर, प्रमोद बावणे, पोअं. दिपक बावणकर व लिलाधर खिरटकर यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी. :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.**

फिर्यादी किशोर पांडुरंग शेंडे, वय ६४ वर्षे, रा. वार्ड नं. ५, पंचशिल नगर, ईसासनी रोड, एमआयडीसी, नागपूर यांचा मुलगा नामे अंकुश किशोर शेंडे, वय ३२ वर्षे यांस दारू पिण्याचे व्यसन असुन, तो कामधंदा करीत नसल्याने, काही वर्षापुर्वी त्याची पत्नी त्याला सोडुन माहेरी निघुन गेली आहे. दिनांक १७.०५.२०२६ चे १७.०० वा. ते १९.१५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, आशिक शहा माशुक शहा दर्गाहकडे जाणाऱ्या कच्च्या रोडवर फिर्यादीचा मुलगा अंकुश यास त्याचा मित्र आरोपी क्र. १) विक्की उर्फ दद्दु संजय मोहोड, वय २८ वर्षे, रा. ईसासनी बुध्द विहार जवळ, एमआयडीसी, नागपुर २) मुकुल रोवतेल यांनी संगणमत करून, दारू पित असतांना कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन, दगडाने ठेचुन जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे एमआयडीसी. येथे सपोनि. संजय बन्सोड ९६५७७१९२९५ यांनी आरोपींविरूध्द कलम १०३(१), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध घेवुन आरोपी विक्की उर्फ दद्दु संजय मोहोड यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे खापरखेडा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १८.०५.२०२६ चे ००.३० वा. ते ००.४५ वा. चे दरम्यान, फिर्यादीचा मित्र नामे निखील संजय चकोले, वय २९ वर्षे, रा. वलनी वस्ती, वार्ड नं. १, खापरखेडा, जि. नागपुर हा त्याचे ताब्यातील वाहन क्र. एम.एच. ४० सि.एच. ४७६५ ने पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत, सन राईझ हॉटेल जवळ, दहेगांव रंगारी, नागपुर येथुन जात असतांना, त्याने त्याचे वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालविल्याने त्याचा वाहनावरील ताबा सुटुन त्याचे वाहन रोडचे मधील डिव्हायडरला धडकले व डिव्हायडरचे पलीकडे जावुन सावनेर कडुन येणाऱ्या ट्रक क्र. सिजी. ०७ बि.झेड. ८८९३ ला समोरून जावुन धडकले. अपघतामध्ये फिर्यादीचा मित्र निखील हा गंभीर जखमी झाला. पोलीसांनी त्यास उपचाराकरीता मॅक्स हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी अक्षय कोठीराम चौधरी, वय २७ वर्षे, रा. वलनी वस्ती, वार्ड नं. १, खापरखेडा, जि. नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे खापरखेडा येथे कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** दिनांक १७.०५.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, संतोषी नगर, जुने पोलीस ठाणे मागील गल्लीत एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ४० ते ४२ वर्षे, अंगात फिक्कट कत्थ्या रंगाचे हाफ टि—शर्ट व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेले बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. नरेश साखरकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सक्करदरा :—** दिनांक १७.०५.२०२६ चे १७.४० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, मोठा ताजबाग, शाही मस्जीद पायथना गेट चे बाजुला फुटपाथवर एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे

५५ वर्षे, रंग सावळा, चेहरा लांबट, उंची ५ फुट ५ इंच, बांधा सडपातळ, दाढी मिशी काळी—पांढरी वाढलेली, अंगात काळ्या पांढऱ्या रेघाटीचे शर्ट तसेच, गोल गळ्याची टि—शर्ट व हिरव्या—निळ्या रंगाचा बरमुडा घातलेले, ओळख उजव्या हाताचे मनगटावर दोरा असुन, हातावर 'संजय चेतन' असे नांव गोंदलेले आहे, अशा वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद वर्णनाचे ईसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सक्करदरा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. अजय कव्हर ९०९६२०४९६१ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**